# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ६७७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १५/१०/२०१६

**१) सर्पद्वंशाने चिमुरडयाचा मृत्यु . :–**

दिंनाक. १२/१०/२०१६ रोजी ०१.४५ वा. दर. यातील मृतक कु. नैतीक टेकराम दिघोरे वय ०५ वर्ष, रा. पोहरा हा आपल्या आजी आजोबासह लाखनी येथे विजय दुर्जन तुराफ यांचे घरी दसरा पाहुण आल्यानंतर जेवन करुन झोपला असता त्यास रात्री झोपेमध्ये सापाने डावे डोळयाचे वर चावा घेतल्याने त्यास औषधोपचारा करीता सा. रु. भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे. भंडारा येथे क्र. ००/१६ क. १७४ जाफौ. चे कागदपत्र पो.स्टे. लाखनी येथे प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. कोसरे यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पो. स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**२) गळफास लावुन इसमाचा मृत्यु . :–**

दिंनाक. १४/१०/२०१६ रोजी १४.३० वा. दर. यातील मृतक आनंदराव वासु वरठे वय ५० वर्ष, रा. पळसपाणी हा पत्नीसह शेतात काम करण्यास गेला व शेतात काम करुन त्याची पत्नी घरी परत आली परंतु मृतक हा घरी परत आला नाही. त्याचा शोध घेतला असता पळसपाणी जंगल शिवारात दुपटयाने पळसाच्या झाडाला गळफास लावुन मृत अवस्थेत मिळून आल्याने फिर्यादी विनोद बाबुराव वरठे वय ३५ वर्ष, रा. पळसपाणी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मडावी पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक १४/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ८६ प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती ०८ केसेस व ईतर वाहनांवरती ७८ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता